**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित**
**ग्राहक तक्रार निवारण मंच**
**कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर**

सं.क्र.काअ/ग्रातनिमं/कोप/केस क्र. ५६/२०१६-१७/१५१ दिनांक:१८-०४-२०१७

**आदेश**
**आदेश केस क्र. ५६/२०१६-२०१७**

१) श्री. महादेव गणपती खानाज : **तक्रार**
९/५९९५/अ/२१ इचलकरंजी **अर्जदार**
ता. हातकणंगले, जिल्हा. कोल्हापूर **(ग्राहक)**

**विरुध्द**

१) कार्यकारी अभियंता (का) तथा नोडल ऑफीसर,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
मंडल कार्यालय, कोल्हापूर

२) कार्यकारी अभियंता, **विरुध्द पक्षकार**
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
विभागीय कार्यालय इचकरंजी

३) अतिरिक्त कार्यकारी अभियंता,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
उपविभाग इचकरंजी ब

**कोरमः-** १.श्री वि.श. गुळवणी, अध्यक्ष
२.श्री. प्र.वि. खपली, सदस्य सचिव,
३. श्री. पी. एस. बुरांडे, ग्राहक सदस्य,

महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

**निर्णय**

मी वि.श. गुळवणी अध्यक्ष, ग्राहक तक्रार.निवारण मंच. कोल्हापूर, खालीलप्रमाणे निर्णय देत आहे.

१) तक्रारदार श्री महादेव गणपती खानाज रा. इचलकरंजी यांनी प्रस्तुतचे गा-हाणे, त्यांच्या जुन्या व फेब्रुवारी २०१० मध्ये कायम स्वरुपी खंडीत केलेल्या औद्योगिक वीज जोडणी ग्राहक क्र. २५०३८०१२०४०९ या वरील तथाकथित थकबाकी रद्द करुन मिळणेबद्दल या मंचासमोर दिनांक १४-०२-२०१७ रोजी दाखल केले आहे.

## गा-हाण्याचे संक्षिप्त स्वरुप

२) तक्रारदार यांचा औद्योगिक वीज ग्राहक क्र. २५०३८००१८३२९ या क्रमांकाचा वीज पुरवठा सध्या चालू असून त्याच ठिकाणी सन १९९१ पासून ग्राहक क्र.२५०३८०१२०४०९ हा वादग्रस्त वीज पुरवठा चालू होता. तो देयकाची रक्कम रु. १,०४,०२०/- भरुन फेब्रुवारी २०१० मध्ये कायमपणे बंद केला होता. त्यावरील तथाकथित थकबाकी वसूलीसाठी वि.प. तर्फे २०१६ पर्यन्त कोणतीही कारवाई तक्रारदार विरुध्द करणेत आली नाही. तथापि वि.प. यांनी दि. १७-०५-२०१६ रोजी तक्रारदार यांना नोटीस देऊन थकबाकीसाठी चालू वीज पुरवठा खंडीत करणेत येऊन थकबाकी चालू वीज जोडणीच्या देयकावर वर्ग करणेत येईल असे कळविले.सदर नोटीस बेकायदेशीर आहे. तक्रारदार यांनी त्यानंतर दि. १०.१२.२०१६ रोजी अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, कोल्हापूर यांचेकडे तक्रार दाखल केली होती. ती दि. २५.०१.२०१७ च्या आदेशाने फेटाळण्यात आल्यामुळे प्रस्तुचे अपिल या मंचासमोर दाखल करणेत आले आहे.

## विरुध्द पक्षाची भूमिका

३) तक्रारदार यांची वर परिच्छेद १ मध्ये नमूद केलेली वीज जोडणी त्यांनी देयकांचा भरणा न केल्यामुळे दि. ०२.०२.२०१० रोजी कायम स्वरुपी बंद केली. नोव्हेंबर २०१६ पासून सुरु केलेल्या PD Amnesty scheme मध्ये सदर तक्रारदार यांनी सहभाग घेऊन दि. ०३.१२.२०१६ रोजी रु. ५०,०००/- जमा केले आहेत. उर्वरीत रक्कम भरण्यास या मंचाने त्यांना आदेश करावेत.

४) सदर प्रकरणाची सुनावणी या मंचासमोर दि. ०६.०४.२०१७ रोजी ठेवण्यात आली तेव्हा तक्रारदारतर्फे प्रतिनिधी श्री विनोद कांबळे, हजर होते. तक्रारदार स्वतः हजर नव्हते. वि.प.तर्फे अतिरिक्त कार्यकारी अभियता श्री एम.बी. काळे, हजर होते. उभयतांचे तोंडी युक्तिवाद ऐकणेत आले. उपलब्ध सर्व कागदपत्रे वाचणेत आली आहेत.

५) या मंचाच्या निर्णयासाठी खालील प्रमाणे मुद्दे उपस्थित होतात.

(१) औद्योगिक वीज ग्राहक क्र.२५०३८०१२०४०९ या तक्रारदार यांच्या दि. ०२-०२-२०१० रोजी कायमपणे खंडीत केलेल्या वीज जोडणी वरील तथाकथित थकबाकी वसूलीस पात्र आहे काय?
उत्तरः- नाही

(२)कोणता अंतिम आदेश?
उत्तरः- शेवटी नमूद केल्याप्रमाणे.

**कारणमिमांसा**

६) तक्रारदार यांचे नावे औद्योगिक वीज जोडणी ग्राहक क्र.२५०३८०१२०४०९ हे दि. ०५.०५.१९९१ पासून चालू होते आणि ते शेवटी फेब्रुवारी २०१० मध्ये कायमपणे बंद करण्यात आले याबद्दल वाद नाही . त्याच ठिकाणी तक्रारदार यांना ग्राहक क्र. २५०३८००१८३२९ ची औद्योगिक वीज जोडणी देणेत आली. तक्रारदार यांचे असे म्हणणेआहे की, त्यांनी जुन्या वीज जोडणीची थकबाकी रु. १,०४,०२०/- भरलेली होती. परंतु सध्या त्यांच्याकडे पावत्या वगैरे पुरावा उपलब्ध नाही. तक्रारदार यांच्या म्हणण्याप्रमाणे जर जुन्या वीज जोडणीची थकबाकी भरलेली नव्हती तर तक्रारदार यांना वरील नविन वीज जोडणी पूर्वीची थकबाकी भरले शिवाय, का देणेत आली याचा खुलासा केलेला नाही.

७) वि.प. यांचे तर्फे तक्रारदार यांच्या जुन्या वीज जोडणीचा जानेवारी २००९ ते फेब्रुवारी २०१६ या कालावधीचा CPL उतारा दाखल करणेत आला आहे. वि.प. यांचेतर्फे तथाकथित थकबाकीपोटी जुनी वीज जोडणी कायम स्वरुपी खंडीत करणेची कार्यवाही फेब्रुवारी २०१० मध्ये करणेत आली. विद्युत कायदा २००३ कलम ५६(१) प्रमाणे अन्य कोणतीही कारवाई म्हणजे तथाकथित थकबाकी वसूलीसाठी सक्षम न्यायालयात दावा दाखल करणे अशी कायदेशीर कारवाई करणेत आली नव्हती असे दिसून येत आहे. सदर कायद्याच्या कलम ५६(२) मधील स्पष्ट तरतूदीनुसार वसुलीस पात्र असलेली (थकबाकीची) रक्कम अव्याहतपणे (Continuouly) वीज देयकामध्ये दर्शवून कायदेशीर मार्गाने वसूलीची कारवाई चालू केल्याशिवाय, मागिल दोन वर्षापेक्षा अधिक कालावधीची थकबाकी कालबाहय ठरते आणि ती वसूलीस पात्र रहात नाही. वादग्रस्त औद्योगिक वीज जोडणीची थकबाकी फेब्रुवारी २०१० च्या पूर्वीची असून ती सततपणे, वेळोवेळी ग्राहकाला दिलेल्या वीज देयकांमध्ये सातत्याने दर्शविली होती, हे दाखवणारा पुरावा उपलब्ध नाही. केवळ CPL उता-याचा फायदा वि.प. यांना देता येणार नाही. त्यामुळे तक्रारदार यांचेकडून त्यांच्या जुन्या व कायमपणे खंडीत केलेल्या वीज जोडणी वरील तथाकथित थकबाकी वसूलीस पात्र नाही असे या मंचाचे निष्कर्ष आहेत.

८) नोव्हेंबर २०१६ मध्ये लागू केलेल्या PD Amnesty Schme मध्ये सहभागी होऊन तक्रारदार यांनी दि. ०३.१२.२०१६ रोजी जुन्या थकबाकीपोटी रु. ५०,०००/- भरले आहेत असे वि.प. यांचे म्हणणे आहे. याबाबत तक्रारदार तर्फे काहीही खुलासा करणेत आला नाही. तथापि , राहिलेली थकबाकी वसूलीस पात्र नसल्याने ती भरणेची तक्रारदार यांना सक्ती करता येत नाही. शिवाय अशी भरण केलेली रक्कम Indian Limitation Act १९६३ च्या कलम १८ प्रमाणे Acknowledgement म्हणून मुदतीत भरणा केली नसल्याने , विचारात घेता येत नाही. सबब, खालील प्रमाणे अंतिम आदेश करणेत येत आहे.

## आदेश

१. तक्रारदार यांच्या जुन्या औद्योगिक वीज ग्राहक क्र.२५०३८०१२०४०९ या वीज जोडणी वरील उर्वरित थकबाकी वसूलीस पात्र नसल्याने ती रद्द करणेत येत आहे.

२. सदर आदेशाची अंमलबजावणी केल्याचे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल ) विनियम २००६ ८.७ नुसार वि.प. यांनी मंचास कळवावे.

३. निर्णयाविरुध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा. बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स,बांद्रा (पूर्व) मुंबई यांजकडे करता येईल.

एकमताच्या / बहुमताच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात यावी.

| | | |
|---|---|---|
| सही/- | सही/- | सही/- |
| (श्री प्र. स. बुरांडे) | (प्र.वि. खपली) | (वि. श. गुळवणी) |
| ग्राहक सदस्य | सदस्य सचिव | अध्यक्ष |